सकाळ, औरंगाबाद. सोमवार २७ फेब्रुवारी २०१७.

# सहकार भीतीपोटी नव्हे, ताठ मानेने चालवा

## हरिभाऊ बागडे : सहकार संगममध्ये विविध विषयांवर चर्चा

औरंगाबाद, ता. २६ : 'सहकार क्षेत्रात भीतीपोटी काम न करता त्यात प्रामाणिकपणा ठेवा. त्रास होणारच आहे; मात्र तो सहन करणार नाही, अशी भूमिका ठेवल्यास ताठ मानेने काम करता येईल,' असा सल्ला विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी दिला.

सहकार भारती देवगिरी प्रांत आणि 'सहकार सुगंध' मासिक यांच्यातर्फे संत तुकाराम नाट्यगृहात रविवारी (ता. २६) 'सहकार संगम' कार्यक्रमाचा समारोप श्री. बागडे यांच्या उपस्थितीत झाला. त्या वेळी ते बोलत होते.

श्री. बागडे म्हणाले, की सहकार क्षेत्रात काम करीत असताना झालेल्या चुका दुरुस्त करून पुढे जाण्याचा प्रयत्न करतो, तोच खऱ्या अर्थाने टिकतो. सहकारी पतसंस्था म्हणजे धर्मादाय संस्था नव्हेत. हा एक व्यवसाय आहे. त्यामुळे दिलेले कर्ज वसूल करण्यासाठी पुढाकार असायला हवा. मात्र, एखादी व्यक्ती काही कारणांनी अडचणीत आली असेल आणि तिला काही पैसा दिला, तर ती उभी राहू शकते, असा विश्वास वाटत असल्यास त्यांना मदत करायला हवी. अडचणीत मदत करणारे जाणीव ठेवतात. ज्या व्यक्तीला पत नाही, अशांना पत निर्माण करून देण्याचे काम खऱ्या अर्थाने पतसंस्थांनी केलेले आहे. अशा संस्थांची कामगिरी वाढायला हवी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.स्वागताध्यक्ष तथा देवगिरी नागरी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले, की अर्थसंकल्पामध्ये थकीत व बुडीत कर्जे होती, त्यांची नफ्यामध्ये तरतूद करावी लागते. मात्र, आयकर खाते त्यास उत्पन्न समजते. त्यावर कर भरावा लागतो. मात्र, त्यासाठी शेड्यूल्ड बँकांना सवलत आहे. यापुढे नॉन शेड्यूल्ड बँकांनाही सवलत असेल, तशी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली. विनय पत्राळे यांनी गीता आणि सहकार चळवळ यांचा कसा संबंध आहे, याबद्दल माहिती दिली. या वेळी सी. ए. राम देशपांडे यांनी 'अर्थसंकल्पात सहकारी संस्थांवर होणारा परिणाम', महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे यांनी 'पतसंस्था चळवळीसमोरील आव्हाने' यावर मते व्यक्त केली. 'सहकार सुगंध'चे भालचंद्र कुलकर्णी, संजय बिर्ला, शांतिलाल सिंगी, प्रभाकर देशमुख, कमलाकर हट्टेकर उपस्थित होते.



**औरंगाबाद : सहकार भारती देवगिरी प्रांत आणि 'सहकार सुगंध' यांच्यातर्फे आयोजित 'सहकार संगम' कार्यक्रमाचे उद्घाटन हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते झाले. यावेळी किशोर शितोळे आदी.**